# निवडणुक प्रचार अभियान डायरी- दि.29.04.2014

**अरुण जेटली**
**(विरोधी पक्षनेते, राज्यसभा)**

30 एप्रिल रोजी होत असलेल्या मतदानासाठी निवडणुक प्रचार काल समाप्त झाला. मी अमृतसरमध्ये आपला निवडणुक प्रचार थांबवला. उमेदवारी घोषित होण्यापासून ते आतापर्यंत सात आठड्यापर्यंत निवडणुक प्रचार चालला. मोठ्या कालावधीपर्यंत सतत निवडणुक प्रचार करणे खुप आव्हानात्मक आहे. समर्पित समर्थकांची टीम आणि निवडणुक मशीनरीच्या व्यतिरिक्त निवडणुक प्रचारात मतदारांची आवड टिकवून ठेवण्यासाठी कोणत्याही उमेदवाराला आपल्या डोक्याचा वापर खुप विचार-विमर्श करुन करावा लागतो. सात आठवड्यादरम्यान सतत एकच गोष्ट बोलून मतदारांमध्ये आवड संपून त्यांना कंटाळा येऊ शकतो.

निवडणुक प्रचारात आधुनिक तंत्रज्ञानाचा खुप महत्त्वपूर्ण उपयोग झाला. रोज सकाळी माझा ब्लॉग माझ्या निवडणुक प्रचाराचा अभिन्न अंग राहिला. त्याने मला अमृतसरमधील लाखो लोकांशी जोडले. यात असे लोक होते जे फेसबुकवर मला फॉलो करित होते, त्यांना रिपोस्ट मिळत होते. मी रोज दहा-पंधरा कार्यक्रमांना संबोधित करत होतो. महत्त्वपूर्ण नागरिकांना भेटण्यासाठी त्यांच्या घरी जात होतो, जिथे शेकडो लोकांशी माझी थेट बातचीत होत होती. गावांत अकाली दल संघटना खुप मजबुत आणि प्रतिबद्ध आहे.

निवडणुक प्रचारात माझा कॉंग्रेसशी सामना झाला ज्यांच्याकडे समझ संपली आहे. कॅप्टन यांनी माझ्याशी पण तशाच प्रकारे निपटण्याचा विचार केला आहे जसे ते अकाली दलाशी नेहमी निपटत आले आहेत. आखडूपणा दाखवा, अशिष्ट राहा आणि खोटे-नाटे आरोप लावा- काही खरे वाटेलच. दुर्दैवाने त्यांना यावेळी वेगळ्या प्रकारच्या निवडणुक प्रचाराचा सामना करावा लागला आहे. माझा निवडणुक प्रचार राष्ट्रीय स्तरावर आणि अमृतसरमधील क्षेत्राच्या मुद्द्यांवर आधारित होता. मी शिष्टाईने मात्र धैर्याने त्यांचा मुकाबला केला. माझ्या विरोधात कॅप्टन यांची निष्क्रिय रणनीति सफल होऊ शकली नाही.

**निवडणुक प्रचार कसा उभा केला जाईल?**

निवडणुक प्रचार जस जसा शेवटच्या दुस-या टप्प्यात पोचला, कॉंग्रेस पक्षाचा निवडणुक प्रचार पुस्तकी भाषा बनून राहिला की, कशा प्रकारे निवडणुक प्रचार आयोजित नाही केला जात. कॉंग्रेसच्या नेत्यांचे भाषण लिहिणा-यांना वाटत आहे की, काही नीरस मुद्दे जसे राज्यांना केंद्राची सहायता, आरटीआय, अन्न विधेयक, भूमि विधेयक निवडणुक प्रचाराचे मुख्य मुद्दे होते. त्यांनी जनतेकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. विधानसभा निवडणुकांचे निकाल घोषित झाल्यावर संपूर्ण देशाला डिसेंबरमध्ये हा आभास झाला होता की कॉंग्रेसचा सफाया होणार आहे. कॉंग्रेसच्या विरोधात सत्तेची विरोधी लाट होती.

याच्या व्यतिरिक्त नरेंद्र मोदी यांनी लोकप्रियता मिळविली होती. कॉंग्रेस विचार करत होती की चिदंबरम, सिब्बल, तिवारी, जयराम, आनंद शर्मा आणि बेनीप्रसाद वर्मा हे असभ्य व अभद्र राहिले तर मोदी यांच्या कहाण्या संपवतील. मात्र त्यांनी स्वतःलाच संपवले. यापैकी अधिकतर एकतर निवडणुक लढवत नाहीत किंबहूना त्यांची आपापल्या निर्वाचन क्षेत्रात तिस-या स्थानी पोचण्याची शक्यता आहे.

जयराम आणि सिब्बल हे कॉंग्रेससाठी ईश्वराने दिलेले विशेष उपहार आहेत. त्यांनी एक नवा निवडणुक प्रचार उभा करण्याचा निर्णय घेतला. ते लहान मुलांप्रमाणे विचार करत टाळी देत होते की, 'टॉफी निवडणुक प्रचार' काम करत आहे मग भले तो खोट्याच्या आधारे उभा असो. राहुल यांनी केजरीवाल यांच्याप्रमाणे करण्याचा निर्णय घेतला. मागील दहा वर्षात सीबीआयचा दुरुपयोग करून सिब्बल आज सीबीआयला बोलत आहेत की ती इशरत जहां प्रकरणी मोदी यांच्या विरोधात खटला चालवत नाही ज्यामध्ये त्यांना काहीच पुरावा मिळाला नाही. मिडियात नवा चमकणारा चेहरा सुरजेवाला याने मोदी यांच्याबरोबर फोटो काढणा-या गर्दीतील एका संशयित मनुष्याला शोधले व अनेक आरोप केले. मात्र कॉंग्रेसला कुठेच सफलता मिळाली नाही म्हणून तिने स्नूपगेट प्रकरण पुन्हा काढले जेणेकरुन काहीतरी सफलता मिळेल. मात्र जेव्हा कुठे काही ठिक चाललयं असे वाटत नाही तेव्हाच मोठ्या चुका होऊ शकतात. असे असूनही त्यांना सफलता मिळणार नाही. कोणत्याही मुद्द्याशिवाय निवडणुक प्रचार लढण्यात खुप संकटे येतात. कॉंग्रेस आपल्याच जाळ्यात ओढली गेली आहे.